# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक १९/०५/२०२१ (बुधवार)

## —: खुन :—

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत ७ कि.मी. अंतरावरील मौजा खेडी कर्यात शेतशिवारात दिनांक १३/०५/२०२१ चे १०/३० वा. चे सुमारास शुभम बाबुराव जाधव वय २५ वर्ष रा. खेडीकर्यात यांनी बैल खरेदीच्या संबधाने खेडीकर्यात शीवारात बाबाराव सुर्यभान परीपगार वय ५५ वर्ष रा. खामली ता. नरखेड यांना बोलावुन १) शुभम बाबुराव जाधव वय २५ वर्षे रा. खेडी कर्यात (२) हेमराज गजानन बाबुलकर वय ४० वर्षे रा.तिनखेडा (३) वैभव सतिस जाधव वय २५ वर्षे रा.खेडी कर्यात (४) उमेश किशनाजी रेवतकर वय ३० वर्ष, रा.तिनखेडा यांनी आपसात संगणमत करून पैश्याचे कारणा वरून बाबाराव सुर्यभान परीपगार वय ५५ वर्ष रा. खामली ता. नरखेड यांचे चेहऱ्यावर, डोक्यावर, काठीन, दगडाने अशा जडवस्तुने जबर मारहान करून ठार करुन पुरावा नष्ठ करण्याचे इरादयाने त्याचे प्रेत विहीरीत टाकले.

सदर प्रकरणी फिर्यादी सुरज बाबाराव परिपगार वय २७ वर्ष रा.खामली ता.नरखेड चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी **१) शुभम बाबुराव जाधव वय २५ वर्षे रा. खेडी कर्यात (२) हेमराज गजानन बाबुलकर वय ४० वर्षे रा.तिनखेडा (३) वैभव सतिस जाधव वय २५ वर्षे रा.खेडी कर्यात (४) उमेश किशनाजी रेवतकर वय ३० वर्ष, रा.तिनखेडा विरुध्द पो.स्टे. नरखेड येथे कलम ३०२,४०४, २०१,३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करुन चारही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.** पुढील तपास पो.नि.जयपालसिंग गिरासे पो.स्टे.नरखेड मो.क्रमांक ८३५५९५५५३८ हे करीत आहेत.

## —: घरफोडी (रात्रीची) :—

**पो.स्टे. खापा :—** अंतर्गत २० किमी अंतरावरील मौजा महारकुंड शिवार लष्करशॅहा दर्गा दिनांक १७/०५/२०२१ चे २३.०० वा दरम्यान दर्गा मधील ठेवलेल्या १ लोखंडी पेटी तसेच १ स्टील दान पेटीचे कुलुप तोडुन त्यामध्ये ठेवलेली नगदी व चिल्लर असे एकुण ५००० रू. कोणीतरी अज्ञात इसमांनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी महेश मधुकरराव बुरडे वय ५२ वर्ष रा. खापा चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे.खापा येथे कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सफौ दिपक मानवटकर मो.क्र. ९८२३४२६३१० हे करीत आहे.

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत ०५ किमी अंतरावरील मौजा चिरव्हा शिवारात देविदास नथ्थुजी बांते रा राधाकृश्ण मंदीर जवळ चिरव्हा यांनी आपल्या शेतातील गोडावुन मध्ये लॉक करुन ठेवलेल्या २ पांढरा काळया रंगाची बकरी व २ काळया लाल रंगाच्या कोंबडया दिनांक १७.०५.२०२१ चे रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमोनी चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी देविदास नथ्थुजी बांते रा राधाकृश्ण मंदीर जवळ चिरव्हा चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथक येथे कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असून पुढील तपास सफौ ११०४ ठाकुर मो नं ७०८३१५१९९३ हे करीत आहे.

## –: चोरी ( चारचाकी वाहन ) :–

**पो.स्टे.मौदा :–** अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील कढोली येथे असलेला जैस्वाल ढाबा समोरील खाली मैदानात दिनांक १७.०५.२०२१ रोजी पार्क करुन ठेवण्यात आलेल्या ट्रक क्र एम एच ४० एन ५२७२ बाबत ट्रक चे मालक दमणसिंग महेन्द्रपालसिंग तुली रा. काश्मीरी गल्ली नागपूर यांचे ट्रकचालकानी खाली मैदानात पार्क करुन ठेवलेला ट्रक मालक दमणसिंग महेन्द्रपालसिंग तुली रा. काश्मीरी गल्ली नागपूर यांनी जावुन बघीतले असता त्यांना त्यांचा ट्रक दिसला नाही आजूबाजूला शोध घेतला परंतू मिळाला नाही, कोणीतरी अज्ञात इसमाने सदर ट्रक चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी दमणसिंग महेन्द्रपालसिंग तुली रा. काश्मीरी गल्ली नागपूर चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. मौदा येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोहवा प्रशांत काळे मो.नं.९८२२५४९६९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर